**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ४५/२०१२ मधील निशाणी ३१९ खालील आदेश.</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ८क विकास हणमंत जाधव यांच्या विरुध्द झालेला अबेटमेंन्टचा आदेश रद्द होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**<u>प्रस्तुत अर्जातील वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–</u>**

२. प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र. ८क विकास हणमंत जाधव हे दिनांक ०७/०८/२०२३ रोजी मयत झाले आहेत. वादीने मुदतीत त्यांचे वारस रेकॉर्डवर घेतलेले नाहीत. वादीने प्रतिवादी क्र. ८क चे वारस रेकॉर्डवर घेण्यास मुद्दांमहुन विलंब केलेला नाही. प्रतिवादी क्र. ८क यांच्या विरुध्द दावा हा वारस रेकॉर्डवर न घेतल्यामुळे अबेट झालेला आहे. त्यामुळे सदर अर्ज मंजुर करुन प्रतिवादी क्र. ८क यांचे विरुध्द झालेला अबेटमेंन्टचा हुकुम रद्द होवुन मिळावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली.

३. अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुतचे प्रकरण हे वादी यांनी वाटपासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जासोबत वादी यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. ८क यांचे वारसांचे विरुध्द सदर प्रकरण चालविण्याचा अधिकार पुढे चालु राहतो. प्रस्तुत प्रकरणात वादीने केलेल्या कथनांवरुन त्यांस मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत असे कथन केले आहे. सदर नमूद कारणामध्ये तथ्य दिसुन येते. प्रतिवादी क्र. ८क चे वारस रेकॉर्डवर

घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दाव्याचा गुणदोषावर निकाल लागण्यासाठी प्रतिवादी क्र. ८क चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ८क च्या विरुध्द झालेला अबेटमेंन्टचा आदेश रद्द करणे योग्य व संयुक्तीक होईल. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज रक्कम रुपये २००/– च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची पुर्तता केल्यानंतर प्रतिवादी क्र. ८क विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

कोरेगाव. (ए. बी. पाटील)

दि. २३/०१/२०२४ दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.